MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

## साईनाथ परभणेवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश
## गेवराई न्यायालयात चार ठेवीदारांच्या अर्जावर निर्णय

गेवराई / प्रतिनिधी

गेवराई : साईराम मल्टीस्टेटमध्ये ठेवलेल्या ठेवी परत न देता फसवणूक केल्याच्या आरोपावरुन चार ठेवीदारांनी न्यायालयात दाखल केलेल्या अर्जावर सुनावणी होऊन साईनाथ परभणे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश दुसरे सह न्या.एन. ए. रणदिवे यांनी दिले. ठेवीदार आशा दत्तात्रय पवार यांच्या ११ लाख २९ हजार ७६२ रुपयांच्या ठेवी होत्या. श्रीकिसन सुजनराव लाड यांच्या १२ लाख ७४ हजार ३७० रुपये तर निरंतर लक्ष्मण लाड व त्यांच्या पत्नीच्या नावे ११ लाख २८ हजार ९७५ रुपयांच्या ठेवी होत्या. तर लक्ष्मीबाई विष्णू फलके यांच्या ३ लाख रुपयांच्या ठेवी होत्या. या ठेवी मागणी करुनही परत मिळत नसल्याने ठेवीदारांनी गेवराई न्यायालयात धाव घेत फसवणूक झाल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचा आदेश देण्याची विनंती केली होती.चारही ठेवीदारांच्या या सर्व प्रकरणाची तारीख एकाच दिवशी ठेवण्यात आली होती. ठेवीदारांच्या वतीने ड. शरद काळे यांनी युक्तिवाद करुन ठेवीदारांची बाजू मांडली होती. चारही प्रकरणात ठेवीदारांचा अर्ज मंजूर करीत साईनाथ विक्रम परभणे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश दुसरे सह न्या. एन. ए. रणदिवे यांनी दिले. फिर्यादीच्या वतीने ड. शरद काळे यांनी काम पाहिले त्यांना ड. शेख अय्याज यांनी सहकार्य केले. न्यायालयाच्या आदेशानंतर आता पोलिसांच्या कार्यवाहीकडे लक्ष लागले आहे.



बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष -०१ अंक -२६४ रविवार दि.१६ जुन २०२४ आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-01 Issue -264 SUNDAY DT. 16 JUNE 2024 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4













# जयदत्त अण्णांसाठी जनसागर लोटला अभूतपूर्व शक्ती प्रदर्शन

- बीडच्या जनतेने ठरवलं पुढची टर्म आमदार जयदत्त अण्णा क्षीरसागर तर हेमंत क्षीरसागर यांना पुढील नगराध्यक्ष म्हणून पसंती.
- बीड जिल्ह्याच्या राजकारणात थोरल्या शिरसागारांचा दबदबा कायमच
- रवींद्र क्षिरसागर जयदत्त अण्णांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल्याने अण्णांची ताकद वाढविण्यासाठी ग्रामीण भाग मजबूत.
- जात धर्म बाजूला ठेवून जयदत्त क्षीरसागरा साठी जनसागर लोटला.
- अजून पक्षाचा निर्णय नाही जयदत्तांना सर्वांना सोबत घेऊन काम करणार तुम्ही सर्वजण माझा परिवार

बीड/प्रतिनिधी

आज बीड शहरातील आशीर्वाद लॉंस या ठिकाणी जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या समर्थकांनी मोठी गर्दी केली होती ती गर्दी म्हणजे बीडच्या राजकारणातील थोरले शिरसागर घेताना यांच्यावर प्रेम करणारे लोक आज एकत्र आले होते तर बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये गेल्या अनेक दशकांपासून क्षीरसागर परिवाराचा धबधबा बीड जिल्ह्यावर राहिलेला आहे स्वर्गीय केशर काकू यांच्या विचारावरती चालणारी जनतांना क्षीरसागर यांनी अनेक वेळा आमदार मंत्रीपद व पक्षाच्या प्रत्येक मेळाव्यात व महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राच्या बाहेर जात भारतामध्ये आपल्या राजकीय कर्तृत्वाचा व आपल्या बीड जिल्ह्याच्या विचाराचा बीड जिल्ह्याच्या मातीत तयार झालेला माणूस म्हणून जगतांना यांच्याकडे पाहिले जात जयंतांना यांनी गेल्या अनेक वर्षांपासून मंत्री पद भूषविले असताना अनेक गोरगरीब जनतेला १८ पगड जातीला न्याय मिळवून देण्याचे काम यावेळी जयदत्त क्षीरसागर यांनी केले आहे. या अगोदर बीडचे पालकमंत्री म्हणून जयदत्त क्षीरसागर यांनी बीड जिल्ह्याचा एक यशस्वी पालकमंत्री व स्वच्छ प्रतिमेचा पालकमंत्री म्हणून त्यांनी त्यांच्या कार्यक्रमांमध्ये बीड जिल्ह्याच्या विकासासाठी बीड जिल्ह्याचा विकास केला सध्याच्या पालकमंत्र्यांनी त्याचा विसर पडलेला आहे मात्र यावेळी बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये जयदत्त क्षीरसागर यांना लोकसभेमध्ये सर्वांनी आपल्या पाठीशी उभा रहावे ही विनंती केली परंतु जयदत्त अण्णा क्षीरसागर हे सध्या कोणत्याच पक्षात नाहीये त्यांनी तटस्थ राहण्याची भूमिका घेतली आणि तटस्थ राहण्याच्या भूमिका घेत असताना त्यांच्या एका इशाऱ्या वरती जे व्हायचे होते ते झाले अशीही चर्चा बीडमध्ये झाली आणि बीडच्या लोकसभेमध्ये शरद पवार गटाचे बजरंग सोनवणे हे निवडून आले. बीडच्या राजकारणाचे लक्ष केंद्रित करीत बीडच्या राजकारणात जयदत्त क्षीरसागर यांच्या मेळावाकडे लक्ष अनेक मात्तकदारांचे लागले होते यामध्ये आज जगताना पक्षप्रवेश करणार व कोणत्या पक्षांमध्ये जाणार हे आज सर्वांना जाहीर होईल आपला पक्षप्रवेश आणखीन जाहीर केलेला नाही आपला पक्षप्रवेश आपल्या सर्वांना विचारात घेतलेल्या नंतरच केला जाईल व आपण सर्व माझा कुटुंब व माझ्या कुटुंबातील परिवार आणि त्या परिवाराचा मी आहे अशाही भावना या व्यक्त केल्या त्यावेळी सगळ्यांनी बोलताना सांगितले की जातीपातीच्या राजकारणाला थारा दिली न देता आणि सर्व जाती-धर्माला सोबत घेऊन स्वर्गीय केशर काकूंचे विचार जनतेपर्यंत पोहोचविण्याचे जिवंत ठेवण्याचे काम भगिनी विजू ताई भाऊ रवींद्र क्षीरसागर पुतणे हेमंत क्षीरसागर रोहित क्षीरसागर साहिल भाई याच्यावर शेषराव फावडे दिनकर कदम डाके नाना जगदीश भाऊ काळे मुखिद लाला अजिंक्य चांदणे प्रमोद शिंदे मनोज नाना मस्के कपिल सोनवणे बंडू निसर्गात मस्के तात्या दीपक थोरात युवराज जाधव सह अनेक दिग्गज कार्यकर्ते या कार्यक्रमाला उपस्थित होते

## पडत्या काळात जयदत्त अण्णांच्या पाठीशी उभा खंबीरपणे उभा राहणारा मुखीद लाला

- मुखिद लाला हा मुस्लिम समाजातील एक तरुण तडफदार युवक नेता म्हणून चेहरा असलेला अण्णांचा समर्थक आहे आज जयदत्त अण्णासाठी रक्ताच्या नात्यापेक्षा जास्त मुखिद लाला धावत आहे. याचाच भाग म्हणून आज मुखीत लाला यांनी अनेक बीड शहरातील मुस्लिम समाजाचेच नव्हे तर १८ पगड जातीच्या लोकांशी सविस्तर चर्चा करून त्यांना त्यांना जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या पाठीशी उभा राहण्यासाठी आपण खंबीरपणे या वेळेस गरज आहे आणि मुखिद लाला यांची हीच नियोजित योजनाही जयदत अण्णा यांच्या पत्त्यावरती पडत आहे. जिथे मुखीत लालाचा नक्कीच खूप मोठा फायदा होत आहे मुखीत लाला हा मुस्लिम समाजातील जरी चेहरा असला तरी मुखीद लाला या तरुणाला सर्वसामान्य १८ पगड जातीतील लोक मानणारा मोठा वर्ग बीड शहरासह विधानसभेमध्ये आहे. तर मुखिद लालाहे बीड नगर परिषदे चे दोन वेळेस चे नगरसेवक राहिलेले आहेत मुखीद लाला यांचा मोठा मित्रपरिवार आहे त्यांच्या पाठीशी सदैव जनता उभा राहत आहे.







कार्यकर्त्यांचा
भव्य मेळावा
प्रमुख मार्गदर्शक
मा.श्री. जयदत्त क्षीरसागर
प्रमुख उपस्थिती
मा.श्री. रविंद्र क्षीरसागर
जगदिश काळे, माधवराव मोराळे, जबरबखान पठाण, विलास बडगे, गंगाधर घुमरे, तानाजी कदम, दिनकर कदम, बाबुसेठ लोढा, नितीनसेठ लोढा, अरूण डाके, वशिष्ठ नवले, चंद्रसेन नवले, रोहित क्षीरसागर, हेमंत क्षीरसागर, शरद ढाकणे, गणपत डोईफोडे, अजिंक्य चांदणे, सुधाकर मिसाळ, मुखीद लाला, ॲड. खाजा, नरसिंग नाईकवाडे, विष्णु वाघमारे, जमील भाई , विलास विधाते, शिवाजीराव जाधव, किशोर पिंगळे, राणा चौहाण, दिलीपराव आहेर, सिध्देश्वर आर्सुळ, भगवान गवते, उषाताई सरवदे,सुभाष क्षीरसागर, दिनेश पवार, सुभाष बनसोडे, सखाराम मस्के, सुधाकर जाधव, धनंजय जगताप,अरूण बोंगाणे,विष्णु जाधव, सुलेमान पठाण ,
विनीत
सचिन घोडके, नवनाथ घोडके, अंकुश खोड, जितु बोबडे, नागसेन मस्के, बबन डोईफोडे, अशोक बोबडे, सर्जेराव मोहिते, बाळासाहेब शिंदे, अशोक भाऊले, अशोक शिंदे, विक्रम पारसकर, दिपक खुर्णे, विठ्ठल साळुंके, सुभाष शिंदे, राम गोले, ॲड. महेश सिंगन, विष्णु भोज, सिध्देश्वर राऊत, पठाण हसनखान, पठाण खाजाभाई, विश्वंभर सावंत, नंदकुमार शेळके, घोडके भगवानराव, सर्जेराव मोहिते, प्रल्हाद घोडके, शेंडगे चंद्रसेन(नाना), नंदकुमार शेळके, बळीराम गाडे, नागेश धट, सुखदेव धट, शेख अय्युब इब्राहिम, शेख मनिर, दिपक बुधनर, मधुकर वडमारे, सुरेश वैद्य, शिवदास शेळके, समाधान शेलार, खंडू चादर, शेख खाजाभाई, बाळु बोबडे, दिलीपराव चौरे, शैकत दौलत बेग, महादेव डोईफोडे, ॲड. अंबादास जाधव, बाबु पवार, सिध्देश्वर ढोकणे, गोविंद खुर्णे, महादेव प्रभाळे, पांडुरंग पवार, कृष्णा राठोड, रंगनाथ पवार,सालार उस्मान बेग, नारायण तुपे,
रविवार - दि.१६ जून २०२४ सकाळी ११.०० वा.
आशिर्वाद मंगल कार्यालय
बार्शी रोड,बीड.

दिव्यांगांची ५ वर्षापासून प्रलंबित असलेली १ ते ५ लाखांची कर्ज प्रकरणे

# डॉ संतोष मुंडे यांनी अधिकाऱ्यांची बैठक घेऊन तात्काळ निकाली काढण्याच्या केल्या सूचना

## महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त विकास महामंडळ मुंबई येथे घेतली बैठक



गेवराई ख प्रतिनिधी

राज्यातील दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आर्थिक साह्य उपलब्ध व्हावे, समाजातील दुर्बल, दुर्लक्षित दिव्यांगांच्या जीवनातील अंधःकार दूर करून त्यांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणावे, या उद्देशाने कंपनी अधिनियम १९५६ नुसार २७ मार्च २००२ रोजी महाराष्ट्र राज्य अपंग व वित्त विकास महामंडळाची स्थापना झाली. हे महामंडळ स्वायत्त असून, समाजकल्याण खात्याच्या देखरेखीखाली कार्यरत आहे. या कार्यालयात ५ वर्षापासून अनेक दिव्यांगाचे १ ते ५ लाखांची कर्ज प्रकरणे प्रलंबित होती, राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजयजी मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग कल्याण मंत्रालय महाराष्ट्र उपाध्यक्ष डॉ संतोष मुंडे सातत्याने दिव्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आग्रही असतात. ५ वर्षापासून अनेक दिव्यांगाचे १ ते ५ लाखांची कर्ज प्रकरणे प्रलंबित आहेत या याबाबीची दखल घेऊन, डॉ संतोष मुंडे यांनी महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त विकास महामंडळ मुंबई या कार्यालयास भेट देऊन प्रलंबित असलेली कर्ज प्रकरणे यांची माहिती घेतली, व संबंधीत विभागातील अधिकारी कर्मचारी यांच्या अडचणी जाणून घेऊन, ही सर्व कर्ज प्रकरणे ताबडतोब निकाली काढण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त विकास महामंडळास यावेळी मुख्य व्यवस्थापक अभय करगुटकर महामंडळाचे एम.डी सपना पाटील मॅडम सह सर्व कर्मचारी उपस्थित होते.

५ वर्षापासून अनेक दिव्यांगाचे कर्ज प्रकरणे प्रलंबित होती, दिव्यांग कल्याण मंत्रालय महाराष्ट्र उपाध्यक्ष डॉ संतोष मुंडे यांनी याबाबीची दखल घेऊन, कर्ज प्रकरणे ताबडतोब निकाली काढण्याच्या सूचना केल्यामुळे अनेक गरजू दिव्यांना कर्ज उपलब्ध होऊन, स्वयंरोजगारासाठी आर्थिक साह्य मिळणार आहे.

लवकरच देशाचे सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री मंत्री रामदासजी आठवले यांची भेट घेऊन, दिव्यांगांसाठी असलेल्या कर्जाची मर्यादा ५ लाखाहुन १० लाख करण्याची मागणी करणार आहे असेही डॉ संतोष मुंडे यांनी सांगितले.

# गहिनीनाथ गडाचे महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांची शुक्रवारी सायंकाळी धनंजय मुंडेंनी घेतली भेट

## काही दिवसांपूर्वी विठ्ठल महाराजांचा झाला होता अपघात; मुंडेंकडून सातत्याने तब्येतीची विचारपूस

पाटोदा ।प्रतिनिधी

कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी श्री क्षेत्र गहिनीनाथ गडाचे महंत ह.भ.प.विठ्ठल महाराज शास्त्री यांची शुक्रवारी (ता.१४) सायंकाळी गहिनीनाथ गडावर जाऊन सदिच्छा भेट घेत त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. महाराजांच्या गाडीला काही दिवसांपूर्वी अपघात झाल्याने ते जखमी झाले होते. दरम्यान धनंजय मुंडे यांनी गडावर जाऊन महंतांची भेट घेतली असून त्यांची प्रकृती आता समाधानकारक असल्याचे म्हटले आहे.

अपघात झाल्यापासून ते त्यांच्यावर दवाखान्यात उपचार सुरू असताना धनंजय मुंडे हे सातत्याने महंतांच्या व संबंधित डॉक्टरांच्या संपर्कात होते. तसेच मुंडे कुटुंबाच्या वतीने युवक नेते अजय मुंडे यांनी पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक मध्ये जाऊन देखील महंतांवर सुरू असलल्या उपचारांची माहिती घेतली होती. दरम्यान आता महंत विठ्ठल महाराज यांच्या तब्येतीत सुधारणा होत असून, त्यांना दीर्घायुष्य मिळावे व त्यांचे कायम आशीर्वाद मिळावेत अशी प्रार्थना आपण वैराग्यमूर्ती संत वामन भाऊ यांच्या चरणी केली असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.



# लिंबागणेश जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शाळा प्रवेशोत्सव निमित्त

## प्रभातफेरी, मोफत पाठ्यपुस्तकाचे वितरण

लिंबागणेश:- शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ मध्ये जिल्ह्यातील सर्व शाळा काल दि.१५ जुन पासुन सुरु झाल्या आहेत.नविन शैक्षणिक वर्षाची सुरुवात मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरी करण्यासाठी प्रवेश पात्र मुलांना प्रवेश देणे,त्यांना शाळेत टिकवुन गुणवत्ता पुर्ण शिक्षण देण्यासाठी विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.त्याअनुषंगाने सकाळी ढोल,घोषणा फलकासह गावातुन प्रभातफेरी काढण्यात आली.नव्याने प्रवेशित होणा-या सर्व विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. मोफत पाठ्यपुस्तके वितरण समारंभ घेण्यात आला.कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक आबासाहेब हांगे, सहशिक्षक अमर पुरी, भरत चौरे,संदिपान आगाम,श्रीमती कुलकर्णी ,सुवर्णा आयाचित यांनी केले होते.यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,शाळाप्रेमी नागरीक, पालक,शिक्षक यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.



# बंडू निसर्गंध यांचा शेकडो कार्यकर्ते सह माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या गटात जाहीर प्रवेश

बीड ।प्रतिनिधी

पेठ बीड विभागातील बंडू निसर्गंध यांनी माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून दिनांक १५ जून २०२४ रोजी जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या उपस्थितीमध्ये शेकडो कार्यकर्त्यांसह जयदत्त अण्णा क्षीरसागर गटात प्रवेश केला या प्रवेश सोहळा वेळी कार्यकर्त्यांचा कार्यकर्ता होण्यापेक्षा यांनी हा प्रवेश केला यावेळी मोठ्या संख्येने बंडू निसर्गात यांचे समर्थक उपस्थित असल्याचे पहावयास मिळेल या प्रवेश सोहळ्यास मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी जयदत्त अण्णा क्षीरसागर यांनी बंडू निसर्गंध यांनी मांडलेल्या प्रश्नावरही उत्तर देताना असे सांगितले की येणाऱ्या काळामध्ये पेड बीड भागातील विकासावर जास्तीत जास्त लक्ष देऊन विकास करण्यात येईल बंडू निसर्गांत यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी प्रवेश केला यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून मुखीद लाला, नाना मस्के, प्रमोद शिंदे, कपिल सोनवणे, सनी वाघमारे,लक्ष्मण (तात्या) मस्के,कल्याण डोंगरे,उत्तम सोनकांबळे, भैय्या साळवे, सुनील निसर्गंध विकी डोंगरे, महेश जाधव, रामा जाधव, सुनील बोचरे,सुधाकर नाईक,रवी शेळके, गणेश शेळके,अमित सपकाळ, भागवत जाधव, भागवत जाधव,शिवाजी जाधव, रमेश गाताडे, साळवे सर, सुदेश कांबळे,विशाल मस्के,विपुल मस्के, सौरभ धनवे,प्रतीक काकडे, कपिल इंकर, बाबासाहेब विणकर,आदित्य राठोड, प्रमोद जाधव,अशोक काकडे, गायके सर, शिवाजी मनोहर,सिद्धांत काकडे, कृष्णा काकडे, अनिल डोंगरे,पप्पू डोंगरे, संतोष सोनकांबळे, जितेश धनवे, प्रताप धनवे, आकाश खेमाडे, नितीन कांबळे,प्रेम निसर्गांन महादेव गुंजाळ,दत्ता गुंजाळ,मुन्ना धनवे, बंटी भोले इत्यादी उपस्थित होते.



# कानिफनाथ घाटातील झाडाझुडपात आढळला महिलेचा मृतदेह!

## आष्टी तालुक्यातील अंभोरा हद्दीतील घटना

आष्टी ।प्रतिनिधी

बीड-नगर राज्य महामार्गावर पिंपरीघाटा येथील कानिफनाथ घाटात शनिवारी दुपारी बाराच्या दरम्यान ४५ ते ५० वर्षीय महिलेचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे.मृतदेह सुलेमान देवळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदनासाठी नेण्यात आला आहे. शवविच्छेदन अहवालानंतरच कारण समोर येणार आहे.आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतील बीड नगर राज्य महामार्गावरील कानिफनाथ घाटात शुक्रवारी एका ४५ ते ५० वर्षीय महिलेचा मृतदेह रस्त्याच्या कडेला झाडात असल्याचे एका वाटसरूला दिसल्यानंतर ही वार्ता वाऱ्यासारखी पसरली.अंभोरा पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेता कसलाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेत मृतदेह झाडाझुडपातून बाहेर काढत सुलेमान देवळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदनासाठी नेण्यात आला आहे. ती महिला कोण, तिचा घातपात झाला कि अन्य कारणाने मृत्यू झाला असावा याचे कारण शवविच्छेदनानंतरच समोर येईल. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता अंभोरा पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे,पोलीस उपनिरीक्षक आदिनाथ भडके,पोलीस अंमलदार शिवदास केदार, पोलीस नाईक बाबासाहेब तांदळे,महिला पोलीस नाईक सुवर्णा पालवे,वाहन चालक राजू कांबळे यांनी भेट देत घटनास्थळाची पाहणी केली. ठाणे हद्दीत ४५ ते ५० वर्षीय महिलेचा मृतदेह आढळून आला असुन साधारण तीन चार दिवसापुर्वीचा हा मृतदेह असल्याचा अंदाज आहे. शवविच्छेदन अहवालानंतरच कारण समजू शकेल. ओळख पटविण्यासाठी मृतदेह प्राथमिक आरोग्य केंद्रात ठेवण्यात आला आहे.असे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांनी सांगितले



बीड - शेख माजीद भाई यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना फहीम इनामदार,नितीन लोखंडे, इरफान मोहम्मद, माजीद मोमीन

# अनिलदादा फाउंडेशनच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा नागरी सत्कार कार्यक्रम संपन्न!

## विद्यार्थ्यांनी पालक शिक्षकांच्या श्रमांचे मोल विसरू नये - अनिलदादा जगताप

बीड ।प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या जीवनाला व करिअरला निर्णायक वळण देणारा महत्वाचा टप्पा म्हणजे इयत्ता १० वी आणि १२ वी ची परीक्षा असते. नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता १० वी आणि १२ वी वीच्या निकालात बीडमधील विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन करत नावलौकिक मिळवला आहे. या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी अनिलदादा जगताप फाउंडेशनच्या वतीने दि. ११ जून २०२४ रोजी सायं ५.०० वाजता बीड शहरातील हॉटेल नीलकमल, बीड येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा नागरी सत्कार या कौतुक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिलदादा जगताप फाउंडेशनचे कार्यवाहक प्रतिक कांबळे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रस्ताविकात अनिलदादा जगताप फाउंडेशन हे अनिलदादा यांनी आजवर केलेल्या जनसेवेच्या कार्यास आणि त्यांच्या विचारांना प्रेरित होऊन स्थापन केले असल्याची माहिती दिली. याबरोबरच अनिलदादा फाउंडेशन स्थापनेचा उद्देश स्पष्ट करून इथून पुढे समाजपयोगी कामात फाउंडेशन सक्रिय सहभाग घेणार असल्याचे सांगितले. या बरोबरच या अनिलदादा फाउंडेशनशी बीडमधील तरुण वर्ग मोठ्या संख्येने जुळत असल्याचे देखील सांगितले.


या कार्यक्रमात इयत्ता दहावी आणि बारावीच्या तब्बल दीडशे गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा नागरी सत्कार करण्यात आला. याबरोबरच शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षकांना देखील सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून गंमतभाऊ भंडारी संपादक दै पार्श्वभूमी यांची उपस्थिती होती. याबरोबरच शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, डॉ विक्रम सारुक शिक्षण अधिकारी माध्यमिक, अर्जुन भोसले सर भोसले कोचिंग क्लासेसचे संचालक, प्रा.सत्येंद्र पाटील सर, शामसुंदरजी पडुळे उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती बीड यांची मान्यवर म्हणून उपस्थिती लाभली होती. सर्व मान्यवरांनी अनिलदादा फाउंडेशनच्या वतीने राबविण्यात आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा नागरी सत्कार कार्यक्रम उपक्रमाचे तोंड भरून कौतुक केले. या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले अनिलदादा जगताप यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे त्यांच्या पालक शिक्षकांचे अभिनंदन केले. याप्रसंगी विद्यार्थी तथा पालकांची मोठ्या संख्यमध्ये उपस्थिती होती. याबरोबरच शिवसेनेचे पदाधिकारी, तथा पत्रकार बांधवांची देखील उपस्थिती होती.



### अनिलदादा जगताप यांनी गुणवंत विद्यार्थ्यांशी साधला मुक्त संवाद

विद्यार्थ्यांनी यशाचे उंच शिखर गाठल्यास किंवा आयुष्यातील मोठ्यांतमोठी स्वप्नपूर्ती केल्यास देखील आपल्या पालकांना आणि शिक्षकांच्या श्रमांना विसरू नये. कारण त्यांचे तुम्हाला घडवण्यात आणि वाढवण्यात मोलाचे योगदान आहे. इथून पुढे तुमचा प्रवास आणखीन मोठा आणि कठीण आहे. मात्र खचू नका, स्वतःला वेळ द्या, अभ्यासाबरोबर मैदानावर देखील वेळ घालावा. मैदानी खेळमुळे स्वस्थ निरोगी आणि तंदुरुस्त राहते. शरीर तंदुरुस्त राहीले तर तुम्हाला तुमच्या ध्येयपूर्तीसाठी धाव घेता येईल असे सांगत विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी अनिलदादा जगताप यांनी शुभेच्छा दिल्या.

# किल्लेधारुर छत्रपती शिवाजी महाराज चौकात बसवला छत्रपतींचा अश्वारुढ पुतळा



किल्लेधारुर । प्रतिनीधी

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील चौथऱ्यावर पहाटे अज्ञात व्यक्तींनी छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा बसवला असून अनेक वर्षा पासूनची मागणी पुर्ण झाली असून ऐतिहासिक शहराचे वैभवातआता भर पडली आहे हे पाहण्यासाठी नागरीकानी गर्दी केली होती.किल्लेधारुर शहरातील बस स्थानकावर राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी वर छत्रपती शिवाजी महाराज चौक आहे. गेली तीस ते चाळीस वर्षांपासून येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा

अश्वारुढ पुतळा बसवण्याची मागणी आहे. त्यादृष्टीने येथे नगर परिषदेच्या वतीने चौथराही निर्माण करण्यात आलेला आहे. मात्र शासकीय नियमावलीच्या दप्तर दिरंगाईत अद्यापपर्यंत येथे पुतळा बसवण्यात आलेला नव्हता. मात्र दि.१४ रोजी चौकातील चौथऱ्यावर अचानक अज्ञात व्यक्तीकडून छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा बसवण्यात आला. यामुळे शहरात एकच चर्चा सुरु आहे. पहाण्या साठी गर्दी केली होती व ऐतिहासीक शहराचे वैभवात यामुळे भर पडली आहे शिबप्रेमी शहरवासिय आनंद व्यक्त करत असून हार, तुरे, फुलांची उधळण करत होते.




आपेगाव सरवदे - होळकर परिवारातील विवाहास उपस्थित राहून शुभेच्छा देताना आदरणीय अक्षयभैय्या मुंदडा व इतर मान्यवर.



आदरणीय श्रीं.गंगाभिषण पारिख सर यांच्या वयाच्या ८७ वर्ष पूर्ण झाली. त्यनिमित्ताने तुला दान करन्यात आले. या कार्यक्रमाला उपस्थित राहून शुभेच्छा देताना आदरणीय नंदकिशोरजी (काकाजी) मुंदड़ा व इतर मान्यवर उपस्थित होते.

# यशस्वी झालेल्या यशवंतांचा गुणगौरव सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे - अँड तात्यासाहेब घुमरे

पाटोदा (प्रतिनिधी)

प्रतीवर्षा प्रमाणे याही वर्षी मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबादचे विधीतज्ञ अँड तात्यासाहेब घुमरे यांच्या वतीने केंद्रीय लोकसेवा आयोगाने घेतलेल्या स्पर्धा परीक्षेत यशवंत झालेल्या विद्यार्थी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे तरी या णझडउ यशवंतच्या गुणगौरव सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे या गुणगौरव सोहळा कार्यक्रमाचे मा.नाना पटोले मा.विधानसभा अध्यक्ष, यांच्या शुभहस्ते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.महेश भागवत अतिरिक्त पोलीस महासंचालक तेलंगणा राज्य कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थितीत मा. अभय थिपसे न्यायमूर्ती उच्च न्यायालय,अलाहाबाद मा.अतुल चव्हाण मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे,नितिश पाथोडे डेप्युटी कमिशनर कस्टम्स मुंबई, रमेश मुंडलोड तहसीलदार संभाजीनगर,बजरंग सोनवणे बीड जिल्हा खासदार, डॉक्टर कुणाल खेमणार साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य पुणे,रुद्राली पाटील अँड.सर्वोच्च न्यायालय दिल्ली, राजेश पावडे संचालक जिल्हा मध्यवर्ती बँक नांदेड य्या प्रमुख मान्यवरांच्या हस्ते होणार असून णझडउ यशवंत विद्यार्थ्यांचा गुण-गौरव सोहळा मोठ्या संख्येने उपस्थित रहावे ठिकाण न्यू इंग्लिश स्कूल,गणेश हॉल,टिळक रोड,पुणे.



दिनांक २२ जून २०२४ रोजी सकाळी १० वाजता आशे आवाहन आयोजक ड.तात्यासाहेब घुमरे (पवार) (मुंबई उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांनी केले आहे

# रक्तदान शिबीरात १६४ रक्तदात्यांनी केले रक्तदान

## गुणवंत विद्यार्थ्यांचाही केला सत्कार बालाघाट प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर शहरात १४ जून रक्तदान दिना दिवशी बालाघाट प्रतिष्ठानच्या वतीने कै. कॅप्टन राजपालसिंह हजारी यांच्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात १६४ रक्तदात्यांनी रक्तदान करून चांगला प्रतिसाद या रक्तदान शिबिराला दिला तत्पूर्वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते या कार्यक्रमात करण्यात आला.धारूर शहरात बालाघाट प्रतिष्ठान अनेक वर्षापासून विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे १४ जून रक्तदान दिन व कै. कॅप्टन राजपालसिंह हजारी यांच्या पुण्यतिथी निमित्त रक्तदान शिबिर हा त्यांचा प्रमुख असलेला कार्यक्रम याही वर्षी मोठ्या उत्साहात पार पडला




प्रतिष्ठानचे अध्यक्ष

डॉ. स्वरूपसिंह हजारी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत १६४ रक्तदात्यांनी पार पडलेल्या रक्तात शिबिरात रक्तदान केले. तसेच रक्तदान शिबिराच्या पूर्वी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमाला देखील मोठ्या संख्येने गुणवंत विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावत बालाघाट प्रतिष्ठानचा येतोचित सन्मान स्वीकारला या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष शेषराव फावडे, लक्ष्मण सिरसट, सराफ असोसिएशनचे अध्यक्ष रामचंद्र निर्मळ, नगरसेवक संचित कोमटवार, डॉ. ज्ञानोबा मुंडे डॉ. राम शिनगारे, नितीन शिनगारे, अतुल शिनगारे मादेक इनामदार, बाळासाहेब कुरुद, भवटनकर आदींची उपस्थिती होत.

# ना जीआर, ना अंमलबजावणी

## मुलींना मोफत शिक्षणाची चंद्रकांत पाटलांची घोषणा हवेतच जिरली?

जून महिना सुरु झाला की विद्यार्थ्यांची प्रवेशाची लगबग सुरु होते. प्रत्येकजण आपल्या आवडीच्या शाळेत, महाविद्यालयात प्रवेश घेत असतो. महाविद्यालयाच्या भरमसाठ फी मुळे अनेक मुलींना दुय्यम दर्जाचे शिक्षण घ्यावे लागते, किंवा शाळाच सोडावी लागते. काही जणांनी आत्महत्या केल्याचीही घटना घडल्या आहेत. परभणीमध्ये गेल्यावर्षी एका मुलीने महाविद्यालयाची फी भरण्यासाठी पैसे नसल्याने आत्महत्या केली होती. त्याची दखल घेत राज्य सरकारकडून मोफत शिक्षणाची मोठी घोषणा केली होती. शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी एक जून पासून राज्यात मुलींना मोफत शिक्षण दिलं जाईल, अशी घोषणा केली होती. पण जून महिना अर्धा उलटला पण सरकारचा जीआर निघाला नाही, किंवा अंमलबजावणी झाली नाही. प्रवेशामुळे मुलींना फी भरावी लागत असल्याचे समोर येते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसावेळी म्हणजे ९ फेब्रुवारी २०२४ रोजी चंद्रकांत पाटील यांनी मुलींना मोफत शिक्षण दिलं जाईल अशी घोषणा केली होती. ज्या मुलींच्या पालकांचे उत्पन्न आठ लाखांपेक्षा कमी आहे, त्या मुलींना वैद्यकीय,अभियांत्रिकी,लॉ,असो की ६६२ कोर्सेस असून यासाठी कुठलीही फी लागणार नाही, शिक्षण मोफत करणार असल्याची घोषणा चंद्रकांत पाटील यांनी केली होती. पण ही घोषणा हवेतच जिरल्याची चर्चा आहे. कारण, अर्धा जून महिना उलटला, महाविद्यालयात प्रवेशही सुरू झाले. मात्र राज्य सरकारचा ना जीआर निघाला, ना अंमलबजावणी झाली. प्रवेशासाठी मुलींना भरमसाठ फी भरावी लागतेय.

मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त चंद्रकांत पाटलांनी केलेली ती घोषणा हवेतच जिरली?

९ फेब्रुवारी २०२४ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी येत्या जूनपासून राज्यातील मुलींना मोफत शिक्षण देण्याची घोषणा केली होती. मात्र ही घोषणा हवेत जिरली असून विद्यार्थिनींना शिक्षण घेण्यासाठी फी भरावी लागत आहे. चंद्रकांत पाटलांनी केलेल्या घोषणेमुळे विद्यार्थी आणि महाविद्यालयांमध्ये वादही होत आहेत.




जळगाव येथील कार्यक्रमात तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा रात्री दोन वाजता फोन आल्याचे सांगत परभणीतील अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या एका मुलीने फी भरण्यासाठी आत्महत्या केल्याची घटना समोर ठेवून एक जून पासून राज्यातील ज्या मुलींच्या पालकांचे उत्पन्न आठ लाखांपेक्षा कमी आहे, त्या मुलींना वैद्यकीय,अभियांत्रिकी,लॉ,असो की ६६२ कोर्सेस असून यासाठी कुठलीही फी लागणार नाही, शिक्षण मोफत करणार असल्याची घोषणा केली होती. या घोषणेची अंमलबजावणी ही एक जून पासून होणार असल्याचं त्यांनी सांगितलं होत. महत्त्वाचं म्हणजे यासाठी किती बजेट लागणार आहे, याचा आकडाही त्यांनी आपल्या घोषणेत सांगितला होता. मात्र याचा उपयोग झाला नाही, जून महिना अर्धा संपलाय सर्वत्र प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्यात. मात्र राज्यातील कुठल्याही महाविद्यालयाला सरकारचा अजूनही आदेशच मिळालेला नाही. विद्यार्थी आमची फीस माफ झाली असल्याचं महाविद्यालयांना सांगत आहेत, तर महाविद्यालय असं कुठलंही परिपत्रक आलं नसल्याचे सांगत आहेत

# ओबीसीच्या आरक्षणाला विरोध करणाऱ्या आमदारांना पाडणार

## प्रकाश शेंडगेंचा इशारा, सगेसोयरेचा जीआर काढलात तर गंभीर परिणाम भोगावे लागतील

बीड - राज्यात ओबीसी समाजाच्या आरक्षणाला विरोध करणाऱ्या आमदारांना विधानसभा निवडणुकीत 'चुन चुन के गिरायेंगे' असा इशारा ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी दिला आहे. तर मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सगेसोयरेचा जीआर काढलात तरी आगामी निवडणुकीत त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा त्यांनी सरकारला दिला आहे.दरम्यान प्रकाश शेंडगे पुढे बोलताना म्हणाले की, राज्य सरकार हे ओबीसी समाजाकडे दुर्लक्ष करत आहे. या मुद्द्यावरुन कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर त्याची जबाबदारी सरकारची आहे. राज्य सरकारकडून आम्हाला ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही, असे लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय आम्ही कोणत्याही बैठकीला जाणार नाही. ओबीसी उपोषणाचा हा वणवा राज्यभरात पेटेल. ओबीसी आरक्षणावरुन कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी सरकारची असेही त्यांनी म्हटले आहे.हाकेंचा राज्य



सरकारवर आरोप

राज्य सरकार ओबीसी समाजाला दुय्यम वागणूक देत असल्याचा आरोप लक्ष्मण हाके यांनी नुकताच केला होता.

राज्यात आता कुठे छोट्या छोट्या घटकांना प्रतिनिधित्व भेटत आहे. त्यांच्या हक्काचे आरक्षण संरक्षित करण्यासाठी आम्ही हे आंदोलन करतोय. शासन पोलिसांच्या मदतीने आमचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करत आहे. ओबीसी समाजाकडून यापूर्वी तीन आंदोलन करण्यात आली. मात्र, शासनाने याची साधी दखल देखील घेतली नाही, याचे आम्हाला दुःख असून शासन ओबीसींना दुय्यम वागणूक देते. आम्ही आमच्या भूमिकेवर ठाम असून कोणत्याही परिस्थितीत उपोषण मागे घेणार नाही, असा पवित्रा लक्ष्मण हाके यांनी घेतला.

### सीएम शिंदेंचा हाकेंना फोन

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फोन करत लक्ष्मण हाके यांना ओबीसी आरक्षणाला कुठलाही धक्का लागणार नाही याची ग्वाही दिली. मात्र, आपल्याला याबाबत लेखी आश्वासन द्यावे, अशी मागणी लक्ष्मण हाके यांनी केली. आता ही मागणी राज्य सरकार मान्य करणार का, हे पाहावे लागेल. तसे घडल्यास मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील हे काय भूमिका घेतात, हे पाहावे लागेल.

# पीककर्जाचे पुनर्गठन न करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांवर कृषीमंत्री कारवाई करणार का?

## शेतकरी संघटनेचा संतप्त सवाल

बीड - दुष्काळी उपाययोजना करण्यात बीडचे पालकमंत्री तथा कृषीमंत्री धनंजय मुंडे अपयशी ठरले आहेत.१० नोव्हेंबर २०२३ रोजी एकनाथ शिंदे सरकारने दुष्काळी उपाय योजना घोषित केल्या.त्याला बीडच्या अधिकाऱ्यांनी वाटाण्याच्या अक्षता लावल्या आहेत. शेतकऱ्यांच्या सहकारी कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्यात आली. तरी बीड जिल्ह्यातील बँक अधिकाऱ्यांनी पीक कर्जाचे 'नवं-जुनं' करण्याचा सपाटा लावला. पीक कर्जाचे पुनर्गठन करून नव्याने पीक कर्ज दिले नाही. भ्रष्ट आणि झुंडशाहीच्या कारभारामुळे अधिकाऱ्यांवर पालकमंत्र्यांचा वचक राहिला नाही का? शासन निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांवर धनंजय मुंडे कारवाई करण्याची हिंमत करणार का? असा सवाल शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी केला आहे.

यावर्षी पावसाला रोहिणी, मृग नक्षत्रात सुरुवात झाली आहे. बीड जिल्ह्यात सुमारे ५० हजार हेक्टर पेरणी उरकली तरिही राष्ट्रीयकृत, ग्रामीण, खाजगी आणि सहकारी बँकांनी पीक कर्जाचे वाटप केले नाही. शेतकऱ्यांनी खाजगी सावकाराकडून उधार,उसनवारी



करून पेरणी सुरू केली आहे. राष्ट्रीयकृत, ग्रामीण, खासगी आणि सहकारी बँकांनी पीक कर्जाचे 'नवं-जुनं' करण्याचा सपाटा लावला आहे. पुनर्गठन करून नवीन पीक कर्ज मागणाऱ्या शेतकऱ्यांना बँक अधिकाऱ्यांनी गहाणखत करायला सांगितले. तसेच पुनर्गठीत कर्ज घेतल्यास तुमचे 'सिबिल' खराब होणार असल्याचा खोटा प्रचार बँक अधिकाऱ्यांनी केला. शेतकऱ्यांनी सुमारे तीन वर्षापासून सोयाबीन विकलेले नाही.अनेकांचा कापूस विक्री विना घरात पडून आहे. ऐन उन्हाळ्यात दरवर्षीप्रमाणे दुधाचे भाव प्रति लिटर १० ते १५ रुपयांनी दूधसंघांनी कमी केले आहेत. वैद्यनाथ,पनगेश्वर,अंबासाखर कारखान्यांनी थकीत ऊस बिले,मालक तोडीची बिले,कामगारांची देणी दिलेली नाहीत. याकडे पालकमंत्री तथा राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे जाणून-बुजून दुर्लक्ष का करीत आहेत? असा सवालही या वेळी विचारण्यात आला आहे.

सन २०१८ सालातील सोयाबीनची सुमारे ३५ हजार शेतकऱ्यांची ६७ कोटी रुपयेपीक विमा नुकसान भरपाईची रक्कम ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि पुणे यांना परत केली. सन २०२० साली मंजूर करण्यात आलेली पीक विम्याची रक्कम धाराशिव परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळाली मात्र बीड जिल्ह्यात अजून मिळालेली नाही. फळबाग,अतिवृष्टी आणि दुष्काळी अनुदानासाठी सतत के.वाय.सी. करण्यास सांगितले जाते. बँक अधिकाऱ्यांच्या अशा मनमानी कारभारामुळे शेतकरी मेटाकुटीला आले आहेत. धनंजय मुंडे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे कृषीमंत्री असताना १० नोव्हेंबर २०२३ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी का होत नाही? धनंजय मुंडे बँकेच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का? असा सवाल शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी केला आहे.

## अंबाजोगाई येथील लोन कलेक्शन ऑफीसरच निघाला दोन गुन्हयातील लुटीच्या घटनेचा मास्टर माईंड

# स्था.गु.शा.बीड ने ०२ गुन्हे उकल करुन ०३ आरोपी केले जेरबंद

)पो.ठा. यु.वडगाव हद्दीत दिनांक ०३/०४/२०२४ रोजी १७०० वा. दिपेवडगाव फाटयाजवळ फिर्यादी गोविंद गुरुबा देमगुंडे वय २६ वर्षे व्यवसाय लोन कलेक्शन ऑफीसर शाखा,अंबाजोगाई रा.पुस ता.अंबाजोगाई हा महिला बचत गटाची लोनची हप्त्याचे १४६३१०/- रु घेवुन फोनवर बोलत असतांना काळया रंगाची स्कार्स्पिओ गाडी मधील ०४ आरोपींनी पैसकी तीन इसमांनी गाडीखाली उतरुन फिर्यादीस चापटा व रॉडने मारहाण करुन टॅब व रोख १४६३१०/- रु जबरीने घेवुन गेले म्हणुन पो.स्टे.यु.वडगाव येथे ८०/२०२४ क.३९४,३४ भादंवि प्रमाणे दि.०५/०४/२०२४ रोजी गुन्हयाची नोंद झाली होती.

२) अंबाजोगाई ग्रामीण हद्दीत दि.०८/०५/२०२४ रोजी १३.४० वा. सुमारास हॉटेल तिरंगा जवळ कारखाना ते अंबाजोगाई जाणारे रोडवर फिर्यादी अशिष दिपक वाघमारे वय ३१ व्यवसाय खाजगी नौकरी लोन कलेक्शन ऑफिसर क्सीस बँक रा.भिमनगर परळी हा नमुद घटनास्थळी उभा असतांना पाठीमागुन तोंडाला भगवा रुमाल बांधुन दोन आरोपीने रस्ता विचारण्याचा बहाणा करुन फिर्यादीस चाकुचा धाक दाखवुन एक सॅमसंग कंपनीचा टॅब व रोख रक्कम ५८३९०/- रु असा एकुण ६३३९०/- रु चा मुद्देमाल जबरीने लुटन नेला होता त्यावरुन पो.स्टे.अंबाजोगाई ग्रामीण येथे गुरनं १४६/२०२४ कलम ३९२,३४१,३४ भादंवि प्रमाणे दि.०८/०५/२०२४ रोजी गुन्हयांची नोंद झाली होती.

सदर दोन्ही जबरी चोरीचे गंभीर गुन्हे उघडकीस आणण्यासाठी मा.पोलीस अधीक्षक,बीड यांनी पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा,बीड यांना आदेश दिले होते. पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.यांनी अशा प्रकारचे गुन्हे करणारे आरोपींची माहिती काढत असतांना गुप्त बातदार मार्फत माहिती मिळाली की, पैसे लुटेचे दोन्ही घटना हया प्रमोद बळीराम थाटकर रा.धनगर गल्ली,अंबाजोगाई व वैभव विष्णु कोकरे रा.दौनापुर ता.परळी यांनी केल्या असुन ते सध्या भगवान बाबा चौक येथे असल्याची खात्री लायक बातमी मिळाली तेव्हा पोनि स्थागुशा यांनी तात्काळ पोउपनि सुतळे व



त्यांचे पथकास रवाना करुन गुन्हे उघडकीस आण्यासाठी मार्गदर्शन केले. पोउपनि सुतळे व त्यांचे पथकाने बातमीचे ठिकाणी आरोपी शोध घेवुन संशयीत हालचाल करत असलेल्या तिघे जन उभे असलेल्या इसमांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी त्यांचे नावे १) प्रमोद बळीराम थाटकर वय २५ वर्षे रा.धनगर गल्ली रविवार पेठ अंबाजोगाई, २) वैभव विष्णु कोकरे वय २० रा.दौनापुर ता.परळी, ३) गोविंद गुरुबा देमगुंडे वय २६ रा.पुस ता.अंबाजोगाई असे सांगुन त्यांना गुन्हया अनुषंगाने सखोल विचारपुस केली असता मुख्य आरोपी गोविंद गुरूबा देमगुडे हा क्सीस बँकेचा लोन ऑफिसर होत त्याने त्याचे इतर तीन साथीदारांसह मिळुन लोन कलेक्शन झाल्यानंतर स्वत:ला लुटण्याचा प्लान करुन लुटीचा बनाव करुन स्वत: तक्रारदार झाला होता. काही दिवसांनी बँकेने देमगुंडे यांला कामावरुन काढुन टाकले होते व त्याने त्याचे इतर साथीदारासह बँकेच्या इतर लॉन ऑफिसरची माहिती काढुन लुटण्याचा प्लान करुन रस्ता अंबा कारखाना ते अंबाजोगाई जाणारे रोडवर एका बँकेच्या ऑफिसरला रस्ता विचारण्याचा बहाणा करुन त्याचे जवळील पैसे व टॅब लुटलेले होते.

स्था.गु.शा पथकाने मुख्य आरोपी १) प्रमोद बळीराम थाटकर वय २५ वर्षे रा.धनगर गल्ली रविवार पेठ अंबाजोगाई व साथीदार २) वैभव विष्णु कोकरे वय २० रा.दौनापुर ता.परळी, ३) गोविंद गुरुबा देमगुंडे वय २६ रा.पुस ता.अंबाजोगाई व आणखीन एक चौथा फरार साथीदार सह सदर दोन्ही जबरी चोरी गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले असून तीन आरोपींना पो.स्टे.अंबाजोगाई ग्रामीण यांचे ताब्यात देण्यात आलेले असुन पुढील तपास चालु आहे. सदरची कामगिरी ही मा. नंदकुमार ठाकुर पोलीस अधीक्षक बीड, मा.अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा येथील पोलीस निरीक्षक श्री.संतोष साबळे, पोउपनि सुशांत सुतळे, पोह रामदास तांदळे, मारुती कांबळे, बाळकृष्ण जायभाये, राजु पठाण, अर्जन यादव चापोह/ अतुल हराळे, व पोशि अश्विनकुमार सुरवसे यांनी केली आहे.

# चौसाळा येथे सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब राऊत यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा

बीड ।प्रतिनिधी

कायम गोरगरीब वंचित लोकांच्या सेवेत असलेले चौसाळा परिसरातील देवीबाभळगाव येथिल रहीवाशी व संत रोहीदास प्रतिष्ठानाचे अध्यक्ष बाळासाहेब राऊत यांचा वाढदिवस चौसाळा येथे विविध सामाजिक उपक्रम राबवुन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.या सामाजिक उपक्रमामध्ये चौसाळा येथे रक्तदान शिबीर राबविण्यात आले या शिबिरामध्ये अनेकांनी रक्तदान केले या रक्तदान शिबिरावेळी प्रमुख उपस्थिती म्हणुन धर्मविर विलास(महाराज)शिंदे,बीड पंचायत समितीचे माजी सभापती काकासाहेब जोगदंड,कृषी उत्तपन्न बाजार समिती सभापती पुत्र वैभवजी मुळे पाटील,चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर,कुणाल जाधव,गणेश(बापु)जोगदंड, विजय नवसेकर,पिन्नु(काका)शिंदे,पांडुरंग रामगुडे,सचिन रामगुडे,के,के,वडमारे,राजु राठोड,अभिजित रिटे,धर्मराज कांबळे,भारत सुरवसे,बबलु शिंदे यांच्यासह विविध राजकिय पक्षातील कार्यकर्त्यांनी या रक्तदान शिबिरास भेट देवुन सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब राऊत यांना शुभेच्छा दिल्या.



# ऑल इंडिया पँथर सेनेमुळे महाविकास आघाडीचा राज्यात विजय झाला - दिपक केदार

## दलित, मुस्लिम, आदिवासी मतदारांनी राजकीय क्रांती केली

बीड ।प्रतिनिधी

ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक केदार यांनी बीड दौऱ्यावर असताना पत्रकार परिषद घेऊन मत व्यक्त केले. यावेळी बोलताना या निवडणुकीत दलित, आदिवासी, मुस्लिम मतदारांनी संविधान वाचविण्याच्या बाजूने मतदान केले. महाराष्ट्रात दलित, मुस्लिम, आदिवासी, बहून घटकांसाठी लढणारी ऑल इंडिया पँथर सेना इंडिया आघाडी सोबत आल्यामुळे राज्यात महविकस आघाडीचा विजय झाला आहे. भाजपने मत विभाजनाचे अनेक प्रयोग राबवले पण त्यांना हाणून पाडण्याचे काम आम्ही केले.

बीड लोकसभा उमेदवार बजरंग सोनावणे यांच्यासाठी आम्ही चार सभेला संबोधित केले, यात आष्टी, बीड, शिरूर, अंबाजोगाई समावेश आहे. माझ्या सारख्या लढाऊ प्रामाणिक, स्वाभिमानी, कार्यकर्त्यांनी संविधान वाचवणे, दलित अत्याचार यावर घेतलेली भूमिकेला मतदाराने गांभीर्याने घेतले आहे आणि राजकीय क्रांती झाली. ऑल इंडिया पँथर सेनेच्या जिल्हा अध्यक्ष व सर्व तालुका अध्यक्षांनी निस्वार्थ काम केले त्यांचे आम्ही स्वागत करतो.

आज आम्ही संविधान वाचवू शकलो हे अभिमानाने सांगू शकतो, नरेंद्र मोदी संविधानाला नतमस्तक झाले हे क्रेडिट आमच्या भूमिकेचे आहे.



राज्यात झालेल्या राजकीय क्रांतीचे आम्ही शिल्पकार आहोत.यापुढे भाजपाला छुप्या पद्धतीने मदत करणारे गट आमच्यापुढे टिकणार नाहीत. आम्ही जिकडे सत्ता तिकडे असेल, आंबेडकरी चळवळीने चौथ्या पर्वाचे नेतृत्व मान्य केले आहे हे या निवडणुकीतून सिद्ध झाले.बीड जिल्ह्यातील जातीय दुराव्याचे वातावरण योग्य नाही. महाराष्ट्राचा मणिपूर करण्याचा काही कर्मठ विघटनवादी विचारांचा अजेंडा आहे. आंबेडकरवादी आज मोठ्या भाऊ होऊन आवाहन करतोय की, सामाजिक सलोखा अबाधित ठेवा. गावगाड्यात आपला आर्थिक स्त्रोत ऐकमेकांशी आहे तो जपला पाहिजे. तरुणांनी राजकीय प्रगल्भ झाले पाहिजे. सन्माननीय पंकजाताई मुंडे यांचा पराभव त्यांच्या भाजप नावाच्या पक्षांमुळे झाला. त्या अपक्ष अस्त्या तर निवडून ही आल्या असत्या पण ४०० पार चा नारा संविधान बदलून टाकण्यासाठी आहे हे भाजपाने पेरले त्यामुळे बीड नाही तर देशात याचा परिणाम झाला. स्मृती इराणी मराठा समाजामुळे पडलेली नाही, आयोधेत भाजपा पडली त्याला कारणीभूत मराठा नाही. देशव्यापी भाजप विरोधी लहर पंकजाताई यांच्या पराभवाचे कारण आहे. त्यामुळे त्यांनी व्यक्तिगत हताश होऊ नये. अफवा, संभ्रम निर्माण करू नये. जातीमुळे पराभव झाला हे चुकीचे आहे. मुस्लिम, दलित, आदिवासी हे भाजप विरोधात होते त्याचा हा फटका आहे. येणाऱ्या विधानसभेला आम्ही मुख्य रोल मध्ये असणार आहोत. या निवडणुकीत अनेकांचे अस्तित्व संपले आहे. कितीही बाशिंग बांधून तयार केलं तरी आता अस्त झालेले उगवणार नाहीत. जिंकण्याचे राजकारण, सत्तेचे राजकारण आम्ही अंगीकारले आहे. अंबाजोगाई केज, उदगीर, मेहकर किंवा माळशिरस या राखीव मतदारसंघातील जागा ऑल इंडिया पँथर सेनेला महाविकास आघाडीने द्यावी अशी आमची रणनीती असेल. लवकरच राज्यव्यापी आधिवेशन घेऊन आम्ही भूमिका जाहीर. असे मत राष्ट्रीय अध्यक्ष दिपक केदार यांनी व्यक्त केले. यावेळी जिल्हा अध्यक्ष नितीन सोनवणे, वशीम शेख, सुर्यकांत ठोकळ, अविनाश वडमारे, विनोद कोरडे, वैभव चक्रे, व संघटनेतील कार्यकर्ते उपस्थित होते.


# बी-बियाण्यांची व खतांची चढ्या भावाने विक्री, बोगसगिरी, लिंकिंग करणाऱ्या निविष्ठा धारकांना बसणार चाप, कृषिमंत्री आक्रमक भूमिकेत!

## बी-बियाणे खतांची उपलब्धी मुबलक, वितरण प्रणाली अधिक कडक होणार - धनंजय मुंडे

मुंबई ।प्रतिनिधी

राज्यात कोणत्याही बी- बियाणांची चढ्या भावाने विक्री, बोगस बियाण्यांची विक्री, लिंकिंग यासारख्या अपराध करणाऱ्या कृषी निविष्ठा दुकानदारांना आता चाप बसणार असून कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी या विषयात आक्रमक भूमिका घेतली आहे. राज्यात आवश्यक असलेले बी - बियाणे मुबलक प्रमाणात उपलब्ध असून खतांची अतिरिक्त मागणी देखील येत्या आठवड्याभरात पूर्ण होईल. मात्र आता बी - बियाणे व खते कीटकनाशके आदींची वितरण प्रणाली मात्र अधिक कडक होणार असून कृषी विभागासह आता पोलीस खात्याचीही यावर करडी नजर असणार आहे.


कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आज याबाबत राज्यस्तरावर बैठक आयोजित करून प्रत्येक जिल्ह्यात त्या जिल्ह्यातील खरीप पिके, त्यांच्या बि-बियानांची व आवश्यक खतांची उपलब्धता, आतापर्यंत झालेला पाऊस, आतापर्यंत झालेली पेरणी, त्याचबरोबर बी - बियाणांची आतापर्यंत झालेली विक्री, संबंधित जिल्ह्यातील पीक कर्ज वाटपाची आकडेवारी तसेच मागील काळात वितरित करण्यात आलेला किंवा प्रलंबित असलेला पिक विमा या सर्व विषयांचा सुमारे ४ तास समग्र आढावा घेतला. या बैठकीसाठी सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, महाबीजचे अधिकारी, कृषी संचालक, कृषी आयुक्त, विभागीय कृषी सहाय्यक संचालक, तसेच सर्व जिल्ह्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व गुण नियंत्रण विभागाचे संचालक व अन्य अधिकारी आदी दुरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. या बैठकीतून धनंजय मुंडे यांनी विभागनिहाय प्रत्येक जिल्ह्यातील वस्तुस्थिती



समजून घेतली.

बि-बियानांची चढ्या भावाने विक्री व इतर चुकीच्या गोष्टी रोखण्यासाठी एक ऐवजी आता प्रत्येक जिल्ह्यात अतिरिक्त तीन भरारी पथके नेमावेत तसेच या भरारी पथकांनी दररोज कमीत कमी २५ दुकानांवर धडक भेटी देऊन तपासण्या कराव्यात, कोणताही गैरप्रकार आढळल्यास जागच्या जागीच गुन्हा दाखल करून परवाना निलंबनाची कारवाई करावी, राज्य शासनाने जारी केल्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्याने आपला स्वतःचा एक इमर्जन्सी हेल्पलाईन व व्हाट्सप नंबर स्थानिक स्तरावर जाहीर करावा, जिल्हाधिकारी व जिखा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी त्यावरील तक्रारीची स्वतः दखल घ्यावी तसेच एक तासात शहानिशा करून त्या तक्रारींचे निरसन करावे, असे निर्देश धनंजय मुंडे यांनी यावेळी दिले आहेत. तालुकास्तरावर प्रत्येक तालुक्यात कमीत कमी दहा तरी डमी गिऱ्हाईके दररोज विविध दुकानांवर पाठवून दर तसेच अन्य बाबींची पडताळणी करावी व कुठेही कोणताही गैरप्रकार आढळल्यास तात्काळ जागच्या जागी कारवाई करावी. कुणाच्याही दबावाला बळी पडू नये किंवा कोणतेही अडचण आल्यास थेट माझ्याशी संपर्क करावा, असेही धनंजय मुंडे बैठकीत बोलताना म्हणाले. प्रत्येक जिल्ह्यात पोलीस दलामार्फत किमान एक उपविभागीय पोलीस अधिकारी दर्जाचे अधिकारी कृषी विभागासाठी समन्वयक म्हणून या काळात नेमावेत व त्यांनी पूर्णवेळ या कामाचे पोलीस सहाय्य उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही सांभाळावी, अशा सूचना धनंजय मुंडे यांनी सर्व जिल्ह्यांच्या पोलीस अधीक्षकांना केल्या आहेत. सोयाबीनच्या उगवण क्षमतेबाबत पेरणीनंतर तक्रारी येतात, त्यामुळे आतापासूनच जनजागृती करून शेतकऱ्यांना घरच्या घरी उगवण क्षमता तपासणी करण्याबाबत मोहीम राबवावी, तसेच खतांचे नमुने वेळोवेळी तपासले जावेत, अशा सूचनाही धनंजय मुंडे यांनी केल्या.या सर्वच्या सर्व कार्यवाहीची अंमलबजावणी येत्या दोन दिवसात करणे अनिवार्य आहे. आवश्यकता असेल तिथे किंवा अधिकारी कर्मचाऱ्यांची कमतरता असेल तिथे महसूल व ग्रामविकास विभागाच्या अधिकाऱ्यांचीही मदत घ्यावी, याबाबत आपण वरिष्ठ स्तरावर निर्णय घेऊ असेही धनंजय मुंडे म्हणाले.

काही जिल्ह्यात आणखी पावसाचे प्रमाण कमी आहे त्यामुळे पेरण्याही उशिरा होतील. या दृष्टीने व अन्य कारणांनी पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट राज्यात सरासरी ३५ ते ४० टक्क्यांच्या घरात सध्या पोहोचले आहे मात्र दरवर्षीचा अनुभव पाहता पिक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट जून महिने अखेर ७५ टक्के च्या पुढे गेलेच पाहिजे तसेच या बाबीचा प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या स्तरावर दर आठवड्याला आढावा घ्यावा अशाही सूचना धनंजय मुंडे यांनी केले आहेत. बीज बँक, शेडनेट यांसह काही जिल्ह्यातील पिक विमा विषयक सूचना काही जिल्हाधिकारी यांनी मांडल्या, या सर्व सूचना कृषी विभागास लेखी स्वरूपात कळवाव्यात त्या संदर्भात स्वतंत्र बैठका घेऊन तातडीने निर्णय घेतला जाईल, अशी माहिती धनंजय मुंडे यांनी दिली.





**भारतीय जनता पार्टीच्या केज विधानसभा मतदारसंघाच्या माजी आमदार संगीता ताई ठोंबरे यांनी आज मला मुलगी झाल्याबद्दल घरी भेट दिली त्यावेळी लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने त्यांचा व कुटुंबाच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी सर्व मित्र परिवार व आमचे मार्गदर्शक भीमराव सरवदे साहेब (बीड जिल्हा कार्याध्यक्ष भीमशक्ती)**

# वडवणी चिंचाळा तिगाव मार्गे बस सेवा चालू करा, कैलास बनसोडे

## ग्रामीण भागातील बस सेवा चालू नसल्यामुळे विद्यार्थी विद्यार्थिनींचे हाल



वडवणी ।प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचाळा या ठिकाणी अशोक माध्यमिक महाविद्यालय आहे ,या ठिकाणी ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी विद्यार्थिनींनी या महाविद्यालयात शिक्षणासाठी जात आहेत, वडवणी तिगाव ,चिंचाळा ही बस सेवा चालू करावी, अशी मागणी तिगाव येथील सामाजिक कार्यकर्त कैलास बनसोडे यांनी केली आहे,

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT